मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ग्लोबल टाइम्स

■ मराठी दैनिक


रविवार

भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

www.theglobaltime.com ■ Register No. : RNI - MAHAMAR /2012/44621 ■ मुंबई ■ अंक : २९२ ■ वर्ष : ११

■ दि. २९ ऑक्टोबर २०२३ ■ पाने : ८ ■ किंमत : ₹३.००

# 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' भित्ती पत्रिकेचे उदघाटन



कोल्हापूर : समाजशास्त्र विभागाच्यावतीने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर विवेकानंद महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या विषयावर भित्तिपत्रिकेच्या माध्यमातून महत्वपूर्ण माहिती मांडली.

नवीन शैक्षणिक धोरण २०२० व त्याचे फायदे-तोटे तसेच एकसमान क्रेडिट पद्धती असल्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार विषय निवडीचे स्वातंत्र्य असणार आहे. या धोरणामुळे वेगवेगळ्या क्षेत्रात करिअर करण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल, विद्यार्थ्यांना त्यांच्या कला गुणांना वाव मिळेल, त्यांना त्यांच्या कौशल्यानुसार शिक्षण घेता येईल, चार वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे वेगवेगळ्या शाखेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या विषयामध्ये संशोधन करण्यासाठी मार्ग मोकळे होतील या दृष्टिकोनातून या भित्तीपत्रिकेत मांडणी करण्यात आलेली आहे.

या भित्तीपत्रिकेचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. एच. व्ही. चामे यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागातील विद्यार्थिनी आरमा मुजावरने केले. यावेळी इतिहास विभाग प्रमुख डॉ. एस. आर. कट्टीमनी, प्रा. डॉ. डी. के. घाडगे, प्रा. आर्या कुलकर्णी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. आभार मृणाल कांबळे या विद्यार्थीनीने मानले.

01/11/23